

# श्श!

## निंदा नको!

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च  ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Shhh! No Gossip!)

# श्श!

## निंदा नको!

# अनुक्रमणिका


1. निंदा 1
2. सामान्य परिस्थिती जेथे निंदा घडते 8
3. निंदेचे नकारात्मक परिणाम 15
4. निंदेविरुद्ध देवाची गंभीर भूमिका 20
5. तुम्ही निंदा कशी हाताळता? 23
6. प्रार्थना 28

# 1
# निंदा

पवित्र शास्त्र, स्तोत्र 15—दाविदाचे स्तोत्र यात—अशा व्यक्तीचे वर्णन करते जो देवाशी संवाद साधू शकतो, त्याच्या सान्निध्यात राहून त्याची उपासना करू शकतो.

**स्तोत्र 15:1-5**
**1 हे परमेश्वरा, तुझ्या मंडपात कोण वस्ती करील? तुझ्या पवित्र डोंगरावर कोण राहील?**
**2 जो सात्त्विकतेने चालतो व नीतीने वागतो, मनापासून सत्य बोलतो,**
**3 आपल्या जिभेने चुगली करीत नाही, आपल्या सोबत्याचे वाईट करीत नाही, आपल्या शेजाऱ्यांची निंदा करीत नाही,**
**4 अधमाला तुच्छ लेखतो, परमेश्वराचे भय बाळगणाऱ्यांचा सन्मान करतो, आपण वाहिलेल्या शपथेने स्वतःचे अहित झाले तरी ती मोडत नाही,**
**5 आपला पैसा वाढीदिढीला लावत नाही, निरपराध्यांची हानी करण्याकरता लाच घेत नाही, तो; जो असा वागतो तो कधी ढळणार नाही.**

ह्या स्तोत्रात अशा व्यक्तीच्या अनेक गुणवैशिष्ट्यांवर जोर देण्यात आला असला तरी, आपण 3 ऱ्या वचनावर लक्ष केंद्रित करू या.

**स्तोत्र 15:3**
**आपल्या जिभेने चुगली करीत नाही, आपल्या सोबत्याचे वाईट करीत नाही, आपल्या शेजाऱ्याची निंदा करीत नाही.**

**स्तोत्र 15:3 (एनएलटी)**
**जो त्यांच्या शेजाऱ्याची निंदा करण्यास अथवा त्यांस ईजा पोहोचविण्यास किंवा त्यांच्या मित्रांविरुद्ध वाईट बोलण्यास नाकार देतो.**

निंदा करणे, चहाडी करणे आणि इतरांविषयी वाईट बोलणे

ही अशी पापे आहेत ज्यांस आम्ही बरेचदा हलक्याने घेतो, पण यांचा देवासोबत आमच्या नात्यावर परिणाम होतो. ही पापे आपल्या सहभागितेत, देवाच्या उपासनेत आणि त्याच्या उपस्थितीच्या आपल्या अनुभवात अडथळा आणतात.

## निंदा म्हणजे काय?

"निंदेची" शब्दकोषातील व्याख्या आहे "इतर लोकांबद्दल अनौपचारिक किंवा अनियंत्रित संभाषण किंवा बातमी, विशेषतः सत्य म्हणून ज्याची पुष्टी झाली नाही असे तपशील समाविष्ट असतात" (ऑक्सफर्ड ॲडव्हान्स्ड लर्नर्स डिक्शनरी). गप्पा किंवा निंदा ही सामान्यतः वायफळ चर्चा किंवा अफवा असते, विशेषतः इतरांच्या वैयक्तिक किंवा खाजगी प्रकरणांबद्दल. हे लोकांबद्दल चुकीची माहिती पसरवणे आहे.

या पुस्तकात, आम्ही निम्नलिखित शब्दांचा उपयोग अदलून—बदलून करणार आहोत, गप्पा, चहाडी, निंदा, पाठीत सुरा खुपसणे, कुजबुजणे, चुगली करणारा—जरी प्रत्येकाच्या अर्थात अगदी लहानसा फरक आहे. पवित्र शास्त्राची एनकेजेव्ही आवृत्ती निंदा, चहाडी करणाऱ्यासाठी, किंवा कुटाळकी करणाऱ्यासाठी "चुगलखोर" या शब्दाचा उपयोग करते. आमच्या समजासाठी, आम्ही थोडक्यात यापैकी काही शब्दांची व्याख्या करणार आहोत, जरी आम्ही त्यांचा उपयोग आलटून-पालटून करतो.

- ***चहाडी करणे*** जी व्यक्ती उपस्थित नाही तिच्याविषयी द्वेषपूर्ण बोलणे; स्वतःच्या बचाव करण्याची संधी न देता एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेस हानि पोहोचविणे. जसे या शब्दाने वर्णन केले जाते, त्याचा अर्थ त्यांच्या पाठीमागे "चावणे" हा शब्द दर्शवितो.
- ***पाठीत सुरा खुपसणे*** एखाद्या व्यक्तीशी मैत्रीचे सोंग करून

त्याचा विश्वासघात करीत त्याच्यावर टीका करण्याचे हे कृत्य आहे.

- ***निंदा*** एखाद्याविषयी खोटे, नकारात्मक, द्वेषपूर्ण आणि बदनामी करणारे विधान करणे किंवा बातमी पसरविणे.
- ***कुटाळकी (चुगली करणारा)*** जो इतरांच्या कुकृत्यांविषयी अधिकाऱ्यास माहिती देतो, सामान्यतः त्यांना पेचात पाडण्याच्या हेतूने, समस्या सोडविण्यासाठी नाही.

जुन्या करारात, देवाच्या लोकांमध्ये सामुदायिक जीवनाविषयी सूचना देत असतांना, परमेश्वराने म्हटले,

**निर्गम 23:1**
**खोटी अफवा उठवू नकोस; दुष्टाच्या हातात हात घालून अन्यायी साक्षी होऊ नकोस.**

**लेवीय 19:16**
**आपल्या लोकांमध्ये चहाड्या करीत इकडे तिकडे फिरू नकोस, आपल्या शेजाऱ्याच्या जिवावर उठू नकोस; मी परमेश्वर आहे.**

दुःखाची गोष्ट ही आहे की, काही लोकांना निंदा करण्यात किंवा चहाडी करण्यात आनंद येतो आणि म्हणून, ते त्यात व्यस्त होतात. निंदा हे काही लोकांसाठी "चमचमीत भोजनासारखे" आहे. त्यांना निंदा करण्यात आणि इतरांविषयी बोलण्यात आनंद वाटतो. एकाध तास निंदेत घालविल्याने त्यांना तृप्ती वाटते. अफवा व्यक्तीच्या हृदयात घुसते. आम्हाला असे वाटते की हे फक्त हलके-फुलके बोलणे आहे ज्यामध्ये काहीही नाही, परंतु ज्याबद्दल गप्पा मारल्या जातात त्याचा लोकांवर परिणाम होतो.

**नीतिसूत्रे 18:8 (नीतिसूत्रे 26:22 समान)**
**कानास लागणाऱ्याचे शब्द स्वादिष्ट पक्वान्नासारखे आहेत,**
**ते अगदी खोल पोटात शिरतात.**

## कोणत्या गोष्टीस निंदा म्हणता येणार नाही?

अशा काही वेळा असतात जेव्हा आम्हाला इतरांविषयी बोलावे लागते, त्यांच्या गुणांविषयी, उणीवांविषयी चर्चा करावी लागते आणि त्यांच्या अपयशांचे मूल्यमापन करावे लागते. तथापि, यांचा निंदा म्हणून विचार करता येणार नाही, कारण जे काही घडले आहे ते उत्तम हेतूसाठी घडले आहे आणि तसे द्वेषपूर्ण पद्धतीने करण्यात आले नाही.

काही उदाहरणांचा विचार करा.

### *अनौपचारिक बोलणे / कोणाचाही अपमान न करता माहिती देणे*

उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्यास भेटण्याचा अनुभव सांगू शकता आणि तुमची वेळ चांगली गेली किंवा नाही, त्या भेटीचा परिणाम सकारात्मक होता किंवा नकारात्मक हे सांगू शकता आणि इतर संबंधित बाबींविषयी चर्चा करू शकता. अशा परिस्थितीत, तुम्ही कोणाचीही बदनामी करण्याचा कोणताही हेतू न ठेवता तुमचे प्रामाणिक मूल्यांकन करता.

### *एखाद्या अनुभवाविषयी सांगणे ज्यात इतरांनी काय म्हटले किंवा केले ते समाविष्ट असू शकते*

येथे सुद्धा, तुम्ही तपशिल देऊ शकता, पण त्यात सहभागी कोणत्याही लोकांना हानि पोहोचविण्यासाठी तुम्ही तसे करीत नाही.

### *एखाद्या अनुभवाचे व्यावसायिक मूल्यांकन अथवा एखाद्या व्यक्तीचे किंवा परिस्थितीचे मूल्यमापन*

कार्यस्थळाच्या परिस्थितींत असे नियमितपणे घडते, उदाहरणार्थ, जेव्हा तुम्ही एखाद्या उमेदवाराच्या  मुलाखातीविषयी बातमी देता, कामगिरीचे मूल्यमापन करता, कठीण परिस्थितीचे निराकरण करता

इत्यादी. या संदर्भांत, तुम्ही यथार्थ चित्र मांडण्यासाठी गुणांची आणि उणीवांची, चांगले आणि वाईटाची प्रामाणिकपणे चर्चा करता.

## *एखाद्या विषयाचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे*

ज्या परिस्थितीत संघर्ष किंवा काही समस्या उद्भवल्या आहेत, आम्ही त्या घटनांच्या मालिकेचे आणि गोष्टींचे पुनरावलोकन करतो जे आम्हाला योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी किंवा पुढील कारवाईच्या मार्गावर निर्णय घेण्यासाठी उपयोगी पडेल. पवित्र शास्त्र आम्हास येथे काही निर्देश देते—*"तुझ्या भावाने तुझा अपराध केला, तर त्याच्याकडे जा, तुम्ही दोघे एकांती असताना त्याचा अपराध त्याला दाखव; त्याने तुझे ऐकले तर तू आपला भाऊ मिळवलास असे होईल. परंतु त्याने जर ऐकले नाही तर तू आणखी एका-दोघांस आपणाबरोबर घे; अशासाठी की, 'दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या तोंडून प्रत्येक शब्द शाबीत व्हावा.' आणि जर त्याने त्यांचे ऐकले नाही तर मंडळीला कळव आणि जर त्याने मंडळीचेही ऐकले नाही तर तो तुला परराष्ट्रीय किंवा जकातदार ह्यांच्यासारखा होवो"* (मत्तय 18:15-17).

## *चुकीचे किंवा नैतिक अपयश असलेल्या प्रकरणाचे निराकरण करताना*

अशा परिस्थितींत सहभागी असलेल्या सर्वांशी संबंधित बाबींस संबोधित करण्याची, झालेल्या वाईटाविषयी बोलण्याची गरज भासते आणि त्यात सुधार व पुनर्स्थापन व्हावे म्हणून कार्य करावे लागते. जे वाईट घडले आहे ते लपविण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाही, तर गलती 6:1 मध्ये सांगितल्याप्रमाणे त्या प्रकरणास आम्ही संबोधित करतो, *"बंधुजनहो, कोणी माणूस एखाद्या दोषात सापडला तरी जे तुम्ही आध्यात्मिक वृत्तीचे आहात ते तुम्ही अशाला सौम्य वृत्तीने ताळ्यावर आणा; तूही परीक्षेत पडू नयेस म्हणून स्वतःकडे लक्ष दे."* पाप आणि चुकीचे काम कबूल

केले जावे आणि त्याविषयी याकोब 5:16 मध्ये निर्देश दिल्याप्रमाणे पश्चाताप करण्यात यावा. *"तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते."*

## *चुकीच्या गोष्टी उघडकीस आणणे यासाठी की लोकांनी चुकीच्या मार्गाने जाता कामा नये*

काही वेळा आम्हाला चिंतेच्या बाबी सार्वजनिकपणे संबोधित कराव्या लागतात आणि चुका आणि चुकीचे काम करणाऱ्यांचा पर्दाफाश करावा लागेल. आम्ही हे इतरांना ताकीद देण्याच्या आणि त्यांचे रक्षण करण्याच्या हेतूने करतो यासाठी की त्यांना हानी आणि धोक्यापासून वाचवता येईल. आमची अंतःकरणे दुष्कृत्य करणाऱ्या लोकांबद्दल दयेने आणि करुणेने भरलेली असताना, आम्ही इतरांच्या मोठ्या भल्यासाठी त्यांची चूक उघड करतो. *"अंधाराच्या निष्फळ कर्मांचे भागीदार होऊ नका, तर उलट त्यांचा निषेध करा"* (इफिस 5:11). *"बाकीच्यांना भय वाटावे म्हणून पाप करणाऱ्यांचा सर्वांसमक्ष निषेध कर"* (1 तीमथ्य 5:20).

वरील सर्व परिस्थितींमध्ये, *"प्रीतीने सत्याला धरून बोलावे"* हा मूळ आधार आहे (इफिस 4:15).

### चिंतन

1) जर मी माझ्या संभाषणांचे बारकाईने परीक्षण केल्यास, किती वेळा मी इतरांबद्दल निंदा करतो आणि वाईट बोलतो?

☐ खूप वेळा ☐ अनेकदा ☐ कधी कधी ☐ क्वचितच

2) निंदा थांबवण्याचा किंवा ते ऐकण्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न न करता इतरांबद्दल लोकांच्या गप्पाटप्पा ऐकण्यात मला किती वेळा आनंद होतो?

☐ खूप वेळा ☐ अनेकदा ☐ कधी कधी ☐ क्वचितच

# 2
# सामान्य परिस्थिती जेथे निंदा घडते

आपण काही सामान्य परिस्थितींचा विचार करूया जेथे आपल्याला निंदेचा सामना करावा लागतो.

## सामुदायिक निंदा

सामान्यतः, विविध कारणांमुळे जुळलेल्या समुदायामध्ये, लोक एकमेकांशी बोलत असताना “बातम्या” पसरतात. आमच्याकडे निवासी समुदाय, सामाजिक समुदाय आणि आणखी काही आहेत. स्थानिक मंडळी देखील एक समुदाय आहे जेथे अनेक लोक त्यांच्या प्रभु येशू ख्रिस्तावरील विश्वास आणि सहभागितेमुळे जोडलेले आहेत.

कोणत्याही समुदायात, एकमेकांबद्दल माहितीची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. हे महत्त्वाचे आहे आणि त्याचे फायदे आहेत.

उदाहरणार्थ, स्थानिक मंडळीतील समुदायाबद्दल, पवित्र शास्त्र आपल्याला सांगते,

**रोम 12:15**
**आनंद करणाऱ्यांबरोबर आनंद करा आणि शोक करणाऱ्यांबरोबर शोक करा.**

**1 करिंथ 12:26**
**एक अवयव दुखावला तर त्याच्याबरोबर सर्व अवयवांना सोसावे लागते; एका अवयवाचा सन्मान झाला तर त्याच्याबरोबर सर्व अवयव आनंदित होतात.**

हे शक्य असल्यास, याचा अर्थ असा होतो की एकमेकांच्या जीवनात काय घडत आहे— बरे आणि वाईट—हे जाणून घेणे

आवश्यक आहे. म्हणून, आम्ही आनंद करतो, आम्ही रडतो, आम्हाला त्रास होतो, आम्ही एकमेकांचा सन्मान करतो आणि या गोष्टींमध्ये एकत्र प्रवास करतो. आम्ही एकत्र आयुष्य सामायिक करतो. तथापि, अशा बातम्यांची देवाणघेवाण चहाडी, निंदा, कानगोष्टी, पाठीत वार किंवा कुटाळकी यांत न पडता सन्माननीय रीतीने करणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, स्थानिक मंडळी किंवा विश्वासू लोकांच्या स्थानिक समुदायाच्या संबंधात निंदा आणि वायफळ चर्चेचा मुद्दा आम्हाला अनेक पत्रांमध्ये आढळतो.

करिंथ येथील मंडळीला जेथे पौलाला लैंगिक अनैतिकतेच्या समस्येस उद्देशून बोलावयाचे होते आणि मंडळीला पश्चात्ताप करण्यासाठी पाचारण करावयास हवे होते, प्रेषित पौलाला खूप काळजी होती की जेव्हा तो त्यांना भेटायला जाईल तेव्हा तो लोकांना “चहाड्या, कानगोष्टी ” यात गुंतलेला पाहील.

**2 करिंथ 12:20**

**कारण मला भीती वाटते की, मी आल्यावर, जशी माझी अपेक्षा आहे तसे कदाचित तुम्ही मला दिसून येणार नाही, आणि तुमची अपेक्षा नाही तसा मी तुम्हांला दिसून येईन; कदाचित भांडणतंटे, ईर्ष्या, राग, तट, चहाड्या, कानगोष्टी, रुसणेफुगणे, अव्यवस्था ही मला आढळून येतील.**

इफिस येथील मंडळीची देखरेख करणाऱ्या तीमथ्याला लिहितांना पौल् तरुण विधवांबद्दल सांगतो—आणि हे सर्व लोकांना सामान्यपणे लागू होईल—की जेव्हा ते आळशी होतात, तेव्हा ते वटवट करू लागतात, इतर लोकांच्या कामात लुडबुड करतात आणि अशा गोष्टींबद्दल बोलतात जे त्यांनी करू नये.

**1 तीमथ्य 5:13**

**शिवाय घरोघर फिरून त्या आळशी होतात; आणि आळशी होतात इतकेच नव्हे, तर वटवट्या व लुडबुड्या होतात, आणि बोलू नये ते बोलतात.**

त्याचप्रमाणे, थेस्सलनीकाकरांना लिहिताना, पौल अशा लोकांना फटकारतो जे लुडबुड करणारे, इतरांच्या व्यवसायात हस्तक्षेप करणारे आहेत. याच्या भागामध्ये इतर लोकाची निंदा करणे आणि वायफळ बोलणे समाविष्ट असेल. पौल अशा लोकांना काम करण्याची आज्ञा देतो.

**2 थेस्सल 3:11,12**
**11 तरी तुमच्यामध्ये कित्येक अव्यवस्थितपणाने वागणारे असून ते काहीएक काम न करता लुडबुड करतात, असे ऐकतो.**
**12 अशा लोकांना आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने आज्ञा व बोध करतो की, त्यांनी स्वस्थपणे काम करून स्वतःचेच अन्न खावे.**

स्थानिक मंडळी समुदायांमध्ये, निंदा कथित आध्यात्मिक मार्गांनी होते. मंडळीचे सदस्य आणि मंडळीचे पुढारी (म्हणजे पाळक इ.) दोघेही निंदा करण्यात आणि अफवा पसरवण्यात गुंतलेले असतात.

येथे काही सामान्य मार्ग आहेत ज्याद्वारे स्थानिक मंडळी समुदायात निंदेचा प्रसार होतो.

## *प्रार्थना विनंती*

संभाषण सामान्यतः यासारख्या अत्यंत आत्मिक विधानाने सुरू होते—"अरे, आपल्याला खरोखरच अमूक अमूक व्यक्तींसाठी प्रार्थना करण्याची गरज आहे" आणि उरलेले संभाषण म्हणजे त्या व्यक्तीबद्दल सगळे कटुत्व आणि निंदा, आणि हे सर्व या वाक्याने संपते "फक्त हे प्रार्थनेत ठेवा." खरोखर काय निंदा झाकण्यासाठी आम्ही या प्रार्थना विनंतीचा दिखावा करतो. हे थांबणे आवश्यक आहे. यापासून दूर राहण्याची निवड करू या.

## *पाळकाचा सल्ला आणि मार्गदर्शन*

आमच्याकडे लोक, पाळक आणि आत्मिक पुढाऱ्यांकडे, आत्मिक मदतीसाठी येतात. असे करताना, बरेचदा ते त्यांचे वैयक्तिक संघर्ष, अपयश आणि इतर गोष्टींविषयी बोलतात जे कदाचित ते इतरांसोबत बोलू शकत नाहीत. ते भरवश्याने आणि चांगल्या विश्वासाने हे सांगतात. तथापि, अनेक पाळक आणि आत्मिक पुढारी सहज संभाषणात खाजगी वैयक्तिक माहिती इतरांना उघड करून हा विश्वास तोडण्यासाठी दोषी आहेत. ही निंदा आहे जरी  ती आध्यत्मिक पुढाऱ्याद्वारे केली गेली असली तरी! हे थांबायला हवे! जे गोपनीयरित्या सामायिक केले जाते ते गोपनीय राहिले पाहिजे.

## *इतरांच्या यशावर शेखी मिरविणारे*

कधी कधी, लोकांना यशस्वी लोकांच्या सोबतीस राहणे आवडते, उदाहरणार्थ, वरिष्ठ पाळक किंवा पुढारी, ते इतरांना हे दाखविण्याचा प्रयत्न करतात की त्यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध आहेत किंवा ते त्यांच्याशी जुळलेले आहेत. ज्या व्यक्तीच्या मागे मागे ते फिरतात त्याच्याविषयी वैय्यक्तिक आणि खाजगी माहिती पसरवून ते असे करतात. अर्थात, इतर लोक प्रभावित होतात आणि त्यांना वाटते की अशी आतील माहिती जाणणारी ही व्यक्ती त्या ज्येष्ठ पाळकाच्या किंवा पुढाऱ्याच्या खरोखर जवळची असावी. हे निंदेशिवाय दुसरे काही नाही. जर तुम्ही खरोखरच खरे मित्र असाल आणि तुमच्या वरिष्ठ पाळकाशी किंवा पुढाऱ्यांशी जवळून संबंधित असाल, तर तुम्ही त्यांचा चुकीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करणार नाही. त्याचा सन्मान तुम्ही स्वतःसाठी घेऊ इच्छिणार नाही. खाजगी बाबींचा सार्वजनिकरित्या उल्लेख करण्यापूर्वी तुम्ही खूप काळजी घ्याल.

## *समस्येचे निराकरण न करता दोष दाखविणे*

लोक चुका करतात. तसेच, समाजात, संघर्ष उद्भवतात कारण कोणीतरी कोठेतरी चूक केली—काहीतरी चुकीचे केले असेल किवा अयोग्यरित्या एखादे प्रकरण हाताळले असेल. अनेकदा असे होते की नाराज पक्ष लोकांनी केलेल्या दुष्कृत्याबद्दल बोलत राहतो, जी अप्रत्यक्षपणे एक “बट्टा लावणारी मोहीम” बनते, ज्याने चूक केली आहे त्याची बदनामी होते. अधिक लोक माहिती प्रसारित करण्यात गुंतू लागतात आणि त्यास निंदेचे स्वरूप प्राप्त होते. यामुळे समस्येस संबोधित न करता किंवा समस्येचे निराकरण न करता समाजात फूट आणि कलह वाढवते. दुसरीकडे, पवित्र शास्त्र आपल्याला अशा परिस्थितीत काय करावे ते शिकवते.

**मत्तय 18:15-17**

**15 तुझ्या भावाने तुझा अपराध केला, तर त्याच्याकडे जा, तुम्ही दोघे एकांती असताना त्याचा अपराध त्याला दाखव; त्याने तुझे ऐकले तर तू आपला भाऊ मिळवलास असे होईल.**

**16 परंतु त्याने जर ऐकले नाही तर तू आणखी एका-दोघांस आपणाबरोबर घे; अशासाठी की, ‘दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या तोंडून प्रत्येक शब्द शाबीत व्हावा.’**

**17 आणि जर त्याने त्यांचे ऐकले नाही तर मंडळीला कळव आणि जर त्याने मंडळीचेही ऐकले नाही तर तो तुला परराष्ट्रीय किंवा जकातदार ह्यांच्यासारखा होवो.**

या प्रकरणाचे निराकरण न करता लोकांच्या चुका लोकांसमोर मांडण्याऐवजी, आपण पवित्र शास्त्रानुसार कार्य केले पाहिजे आणि क्षमा, सुधारणे आणि बरे करण्याच्या दिशेने कार्य केले पाहिजे.

स्थानिक मंडळीच्या संदर्भात सांगितलेल्या अनेक गोष्टी इतर समुदायांना देखील लागू केल्या जाऊ शकतात.

जो समुदाय निंदा करण्यात गुंततो तो शेवटी स्वतःचा नाश ओढवून घेतो.

**गलती 5:15**
**परंतु तुम्ही जर एकमेकांना चावता व खाऊन टाकता तर परस्परांच्या हातून एकमेकांचा संहार होऊ नये म्हणून जपा.**

## कामाच्या ठिकाणी निंदा

आमच्यापैकी अनेक जण आपल्या जीवनांचा मुख्य भाग कामाच्या ठिकाणी घालवतात. आम्ही आठवड्यातून पाच ते सहा दिवस काम करतो, आपल्या कामाच्या ठिकाणी आपण दर आठवड्यास आपल्या वेळेचा तीन चतुर्थांश भाग घालवितो. दुर्दैवाने, कामाच्या ठिकाणी अनेक लोक गप्पा, चहाडी, निंदा, पाठीत सुरा खुपसणे, किंवा कुटाळकीत वेळ घालवितात. ते असे अधिकाऱ्याविषयी, त्यांच्या सोबत्यांविषयी किंवा ज्यांच्यासोबत ते काम करतात, त्यांच्याविषयी करीत असतील. ते निंदा करतात, ते आणखी कोणी केलेल्या कुठल्यातरी गोष्टीविषयी सहकाऱ्याशी बोलून त्यांची बदनामी करतात.

निंदेमुळे कामाच्या ठिकाणचे वातावरण दूषित होते. हे लोकांस भावनात्मकरित्या प्रभावित करते आणि म्हणून, वैयक्तिक किंवा सांघिक कार्यक्षमतेत बाधा आयेते. कालांतराने, कामाचे वातावरण इतके डुषित होते की अनेकदा चांगले लोक, सोडून जातात आणि इतरत्र नोकरी करू लागतात. पगार चांगला नसल्यामुळे किंवा काम उत्साहवर्धक नसल्यामुळे ते सोडत नाहीत, तर बऱ्याचदा कामाचे वातावरण केवळ निंदा करणाऱ्या आणि अफवा पसरवणाऱ्या काही लोकांमुळे दुःखदायक होते. ज्या चांगल्या लोकांना त्यांच्या कामावर लक्ष केंद्रित करायचे आहे त्यांना त्यांचा वेळ आणि शक्ती निंदा करण्यात आणि अफवा पसरवण्यात खर्च करायची नसते. त्यांना त्यापेक्षा चांगल्या गोष्टी करावयाच्या असतात!

## सामाजिक माध्यमाद्वारे निंदा

सामाजिक माध्यमाद्वारे निंदेचा अर्थात खोट्या बातम्यांचा प्रसार करण्याचा वेगवान मार्ग देखील पुरविला आहे. अगदी काही मिनिटांत, एका बटणाच्या क्लिकवर हानिकारक गप्पा आणि अफवा ऑनलाइन पसरू शकतात. ऑनलाइन पोस्ट केलेल्या एका लेखाद्वारे एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते.

### चिंतन

1) तुम्ही समाज, कामाचे ठिकाण किंवा सामाजिक माध्यमाद्वारे निंदेस बळी पडला आहात का?

- तुम्ही याद्वारे कसे प्रभावित झाला होता?
- तेव्हा तुम्ही ते कसे हाताळले?
- मागे वळून पाहता, तुम्ही परिस्थिती वेगळ्या पद्धतीने हाताळू शकला असता का?

# 3
# निंदेचे नकारात्मक परिणाम

हिंसाचाराच्या इतर काही कृत्यांप्रमाणे निंदा घृणित अपराध वाटत नसेल, पण आमच्यापैकी अनेक लोकांस हे समजत नाही की निंदेचा किती गंभीर नकारात्मक परिणाम आमच्यावर आणि इतरांवर घडून येतो. आम्ही आधीच निंदेच्या काही नकारात्मक परिणामाविषयी सांगितले आहे, या प्रकरणात आपण काहींचा विचार करू या.

## निंदा अनुत्पादक आहे आणि त्याने वेळ वाया जातो

काही वेळा गप्पांमध्ये, निंदेत गुंतलेल्या लोकांसोबत तास निघून जातात. म्हणूनच त्याला "वायफळ चर्चा" असे म्हणतात. ती पूर्णपणे निष्फळ आहे. त्यात केवळ वेळच वाया जात नाही, तर अनेकदा निंदेत गुंतलेले लोक खूप भावनात्मक ऊर्जा खर्च करतात आणि शेवटी थकून गेल्यासारखे त्यांना वाटते.

कधी कधी लोक मनातील गोष्टी "बाहेर काढण्यासाठी" किंवा स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी उपचारात्मक उपाय म्हणून गप्पांमध्ये गुंततात, विशेषतः कठीण समयातून जात असताना. आम्ही बोलण्याच्या आणि स्वतःची आव्हाने बोलून दाखविण्याच्या महत्त्वाशी सहमत आहोत, पण असे योग्य लोकांशी बोलून आणि दुसऱ्या व्यक्तीला वेदना न पोहोचविता निरोगी रीतीने आणि समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नपूर्वक करणे आवश्यक आहे.

## निंदा विश्वास नष्ट करते कारण एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा बिघडली जाते आणि त्यांच्या चारित्र्याचा खून केला जातो

ज्या व्यक्तीची निंदा केली जाते त्याचा "खून" होत असताना त्याला स्वतःविषयी स्पष्टीकरण देण्याची संधी मिळत नाही आणि त्याची प्रतिष्ठा नष्ट होते. एका क्षणात, चुकीची माहिती ऐकणारे लोक एखाद्या व्यक्तीच्या चारित्र्याबद्दल निष्कर्षापर्यंत पोहोचतात, त्या व्यक्तीचा चुकीचा न्याय करू शकतात आणि त्या व्यक्तीवरील विश्वास गमावू शकतात. निंदेद्वारे चुकीची माहिती दिल्याने ती व्यक्ती कोण आहे याचे चुकीचे चित्र त्यांच्यासमोर येते.

**नीतिसूत्रे 11:13**
**लावालावी करीत फिरणारा गुप्त गोष्टी उघड करतो, पण जो निष्ठावान असतो तो गोष्ट गुप्त ठेवतो.**

जर तुम्ही एक विश्वासू मित्र असाल, तर तुम्ही तुमच्या मित्राच्या पाठीशी उभे राहण्याचा प्रयत्न कराल आणि त्याला अपमानित करण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी त्याची चूक उघडकीस आणणार नाही.

कधी कधी एखाद्याला पहिल्यांदा भेटणे धक्कादायक असू शकते आणि त्यांनी तुमच्याबद्दल आधीच ऐकले आहे असे दिसते आणि दुर्दैवाने, त्यांनी जे ऐकले ते सर्व नकारात्मक असते. निंदेने पुढे प्रवास केल्याचे दिसते आणि तुम्ही तेथे पोहोचण्यापूर्वीच तुमच्या नावाची बदनामी आणि नुकसान केलेले असते. मग, त्या व्यक्तीला तुम्हाला खरोखर जाणून घेण्यास आणि तुम्ही खरोखर कोण आहात याचे नव्याने मूल्यांकन करण्यात मदत करण्याचे मोठे कार्य तुमच्यासमोर उभे ठाकते. कधीकधी यातून काम करावे लागेल असा विचार निराशाजनक असू शकतो.

## निंदा लोकांना भावनात्मकरित्या प्रभावित करते

वणव्याप्रमाणे निंदेद्वारे पसरणारी चुकीची माहिती भावनांस प्रभावित करू शकते ज्यामुळे चिंता निर्माण होते आणि लोकांचे मनोधैर्य खचते.

**नीतिसूत्रे 25:18**
**जो शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देतो तो घण, तलवार व तीक्ष्ण बाण ह्यांसारखा आहे.**

**नीतिसूत्रे 25:18 (एनएलटी)**
**इतरांविषयी खोटे सांगणे त्यांना कुऱ्हाडीने मारण्यासारखे, तरवारीने घाव करण्यासारखे, तीक्ष्ण बाण फेकण्यासारखे आहे.**

उदाहरणार्थ, कामाच्या ठिकाणी, वास्तविक तथ्य काय आहे आणि काय नाही याबद्दल कोणतीही स्पष्ट माहिती नसल्यामुळे अफवा पसरल्याने कर्मचारी निराश होऊ शकतात. हे कामाचे वातावरण दूषित करते आणि चांगले कर्मचारी सोडू इच्छितात.

त्याचप्रमाणे, मंडळीमध्ये, जर विश्वासणारे गप्पा, निंदा, चहाडी आणि कुटाळकी करण्यात गुंतले असतील तर यामुळे लोक अशा मंडळीचा भाग होऊ इच्छित नाहीत आणि ते मंडळीतून बाहेर पडतात किंवा सोडून जातात.

वैयक्तिकरित्या किंवा ऑनलाइन निदेंद्वारे व्यक्तींना लज्जित करणे एखाद्याच्या वैयक्तिक प्रतिष्ठेला जवळजवळ त्वरित नुकसान होऊ यामुळे शकते. लोक त्यांची प्रतिष्ठा आणि नावलौकिक गमावतात आणि केवळ कुटाळकी आणि निंदा या निर्घृण कृत्यामुळे त्यांना खूप भावनात्मक आघात सहन करावे लागतात.

किशोरवयीन मुलांवरही गप्पांचा भावनात्मक प्रभाव किती गंभीर आहे याचा विचार करा. सध्याच्या काळात, किशोरांना सामाजिक माध्यमांद्वारे मित्र किंवा शाळेतील सोबत्यांद्वारे ऑनलाइन

"धमकी" दिली जाते, त्यांच्याबद्दल निंदा आणि वाईट या मर्यादेपर्यंत बोलले जाते की काही जणांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे "सायबर बुलींग" ही संज्ञा देखील निर्माण झाली आहे, जी तंत्रज्ञानाचा वापर करून दुसऱ्या व्यक्तीला त्रास देणे, धमकावणे, लाजिरवाणे करणे किंवा लक्ष्य करणे आहे आणि ही एक गंभीर गोष्ट आहे. [किशोरवयीन मुलांच्या पालकांसाठी उपयुक्त संसाधन साइट — **http://cyberbullying.us/1**.]

## निंदेमुळे नातेसंबंध नष्ट होतात

गप्पा, निंदा आणि इतरांबद्दल खोटी माहिती पसरवणे यामुळे अनेकदा नातेसंबंध तुटतात. जेव्हा लोक ऐकलेल्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवतात तेव्हा ते दुखावले जातात. रागाच्या भावना आणि वाईट भावना निर्माण होतात आणि चांगले नातेसंबंध नष्ट होतात.

पवित्र शास्त्र काय म्हणते ते विचारात घ्या.

**नीतिसूत्रे 16:28**
**कुटिल मनुष्य वैमनस्य पसरतो; कानास लागणारा मोठ्या स्नेह्यांत फूट पाडतो.**

**नीतिसूत्रे 25:23**
**उत्तरेचा वारा पाऊस आणतो, त्याप्रमाणे चुगलखोर जीभ मुद्रा क्रोधाविष्ट करते.**

**नीतिसूत्रे 25:23 (एनएलटी)**
**उत्तरेचा वारा पाऊस आणतो, हे जसे निश्चित आहे त्याप्रमाणे चुगलखोर जीभ क्रोध उत्पन्न करते!**

**नीतिसूत्रे 26:20**
**सरपण नसल्यामुळे विस्तव विझतो; कानाशी लागणारा कोणी नसला म्हणजे तंटा मिटतो.**

अविश्वास आणि कलह पेरल्या गेल्याने निंदेच्या लहान बिया चांगल्या मित्रांना वेगळे करण्यास कारणीभूत ठरू शकतात. नातेसंबंध

दुरावतात. निंदा चुकीच्या भावना आणि वाईट भावनांना उत्तेजन देते. त्यांची बाजू घ्यायला लावली जात असल्याने लोकांमध्ये फूट पडली आहे. हे कामाच्या ठिकाणी किंवा कोणत्याही समुदायात होऊ शकते. शांतता आणि सुसंवाद राखण्यासाठी, निंदा थांबेल याची खात्री करणे जरूरी आहे.

## चिंतन

1) निंदेचे इतर काही नकारात्मक परिणाम काय आहेत ज्यांचा तुम्ही विचार करू शकता?

2) अशा काही वास्तविक जीवनातील परिस्थिती आहेत का ज्यांचे तुम्ही निरीक्षण केले आहे जेथे निंदेमुळे लोकांना भावनात्मकरित्या प्रभावित केले आहे? त्याचा परिणाम काय झाला?

3) अशा काही वास्तविक जीवनातील परिस्थिती आहेत ज्यांचे तुम्ही निरीक्षण केले आहे जेथे निंदेमुळे नातेसंबंध नष्ट होतात? त्याचा परिणाम काय झाला? लोकांमध्ये समेट झाला आणि ते निंदेचा अंत करू शकले का? तसे असल्यास, त्यांनी हे कसे केले?

# 4
# निंदेविरुद्ध देवाची गंभीर भूमिका

गप्पा, निंदा, चहाडी, पाठीत सूरा खुपसणे आणि कुटाळकी यासंबंधी आपण पवित्र शास्त्रात जे काही पाहिले आहे त्याशिवाय, आपण निंदेसंबंधाने देव पवित्र शास्त्रात जी गंभीर कानउघाडणी करतो त्यावर विचार करू इच्छितो.

देवाने आपल्या लोकांना ज्या दहा आज्ञा दिल्यात त्यापैकी एक आहे,

**निर्गम 20:16**
**आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नकोस.**

याचा अर्थ हा आहे की तुम्ही खोटे बोलणार नाही, तुमच्या शेजाऱ्याविषयी चुकीचे वर्णन करणार नाही अथवा त्याच्याविषयी खोटी माहिती पसरविणार नाही.

देव निंदेत गुंतलेल्या लोकांना रागावतो आणि चेतावणी देतो की सुधार करण्यासाठी आणि सर्व काही व्यवस्थित करण्यासाठी तो हस्तक्षेप करील.

**स्तोत्र 50:19-21**
**19 तू आपले तोंड दुष्टपणासाठी मोकळे सोडले आहेस, तुझी जीभ कपटाची योजना करते.**
**20 तू आपल्या भावाविरुद्ध बोलत बसतोस; तू आपल्या सख्ख्या भावाची चहाडी करतोस.**
**21 असे तू केलेस तरी मी उगा राहिलो; मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन. मी तुझी कृत्ये तुझ्यापुढे मांडीन.**

खोटी साक्ष देणारे असणे, इतर लोकांबद्दल खोटे बोलणे आणि

बंधूंमध्ये फूट पाडणे या गोष्टींचा देवाला तिटकारा आहे.

**नीतिसूत्रे 6:16-19**
**16 परमेश्वर ज्यांचा द्वेष करतो अशा सहा गोष्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे:**
**17 उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात,**
**18 दुष्ट योजना करणारे अंतः करण, दुष्कर्म करण्यास त्वरेने धावणारे पाय,**
**19 लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावाभावांत वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत.**

आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, आपण लोकांमध्ये कलह किंवा मतभेद पेरण्याचा एक मार्ग म्हणजे गप्पा आणि निंदा. ही अशी गोष्ट आहे जी देवाला आवडत नाही.

निंदा करणाऱ्याला मूर्ख म्हणतात. तर निंदा करण्यात गुंतणे ही मूर्खपणाची गोष्ट आहे.

**नीतिसूत्रे 10:18**
**गुप्तपणे द्वेष करणाऱ्याची वाणी असत्य असते, आणि चहाडी करणारा मूर्ख असतो.**

रोम 1:28-32, निंदा आणि चहाडी यांस खून, अनैतिकता इत्यादींच्या यादीत समाविष्ट करते.

**रोम 1:28-32**
**28 आणखी ज्या अर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले.**
**29 सर्व प्रकारची अनीती, जारकर्म, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा ह्यांनी ते भरलेले असून हेवा, खून, कलह, कपट, कुबुद्धी ह्यांनी पुरेपूर भरलेले होते.**
**30 ते चहाडखोर, निंदक, देवाचा तिटकारा असलेले, उद्धट, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्मकल्पक, मातापितरांची अवज्ञा करणारे,**
**31 निर्बुद्ध, वचनभंग करणारे, ममताहीन, निर्दय असे होते.**
**32 जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत, हा देवाचा निर्णय त्यांना**

**ठाऊक असूनही ते स्वतः त्याच गोष्टी करत असतात; इतकेच केवळ नव्हे तर त्या करणाऱ्यांना संमतीही देतात.**

*"जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत"* (रोम 1:32) या चेतावणीत निंदा करणारे आणि चहाडी करणारे यांचा समावेश आहे. निंदेविरुद्ध देवाची अशी गंभीर भूमिका आहे. सरळ शब्दांत, निंदा करणे पाप आहे. हा देवासमोर अपराध आहे.

सारांश रूपात, गप्पा, निंदा, चहाडी, पाठीवर वार करणे आणि कुटाळकी करणे या अशा गोष्टी आहेत ज्यात आपण मुळीच गुंतता कामा नये.

## चिंतन

1) जर पवित्र शास्त्र गप्पा, निंदा, चहाडी, पाठीत सूरा खुपसणे आणि कुटाळकी करणे या पापाबद्दल इतके स्पष्ट आहे, तरीही विश्वासणारे हे करण्यात गुंतलेले आणि सहभागी का आहेत?

# 5
# तुम्ही निंदा कशी हाताळता?

आपल्या सभोवतालचे लोक गप्पा, निंदा, चहाडी आणि अफवा पसरवण्यास सुरुवात करतात अशा ठिकाणी आपण असताना काय करावे? अशा गोष्टींना आपण बळी पडलो तर काय करावे? आपल्याबद्दल पसरविली जाणारी अपकीर्ती, भावनात्मक क्लेश आणि खोट्या माहितीच्या इतर परिणामांना आपण कसा प्रतिसाद द्यावा आणि कसे हाताळावे?

## निंदेच्या वर उठा

सुरुवातीला, आपल्यापैकी प्रत्येकाने वैयक्तिकरित्या एक निश्चित निवड केली पाहिजे आणि शिस्तबद्ध असले पाहिजे की आपण कोणत्याही प्रकारे गप्पांमध्ये गुंतणार नाही किंवा त्यात भाग घेणार नाही. आम्ही संभाषण आणि कृतींच्या इतक्या खालच्या पातळीवर उतरणार नाही. जेव्हा आपण अनवधानाने स्वतःला अशा ठिकाणी आणि परिस्थितीत पाहतो जेथे लोक निंदा करतात, तेव्हाही आपण भाग घेणार नाही आणि गप्पांमध्ये गुंतणार नाही.

**स्तोत्र 34:13**
**तू आपली जीभ दुर्भाषणापासून व आपले ओठ कपटी भाषणापासून आवर.**

**स्तोत्र 39:1**
**मी म्हणालो की, “मी आपल्या जिभेने पाप करू नये म्हणून आपल्या चालचलणुकीस जपेन; माझ्यासमोर दुर्जन आहे तोपर्यंत मी आपल्या तोंडाला लगाम घालून ठेवीन.”**

**स्तोत्र 139:4**
**हे परमेश्वरा, तुला मुळीच ठाऊक नाही, असा एकही शब्द माझ्या मुखातून निघत नाही.**

आम्ही स्वतःला आवरू आणि देवाविरुद्ध पाप करण्यास नकार देऊ. आम्हाला माहित आहे की आम्ही आमच्या गप्पा अथवा निंदा देवापासून लपवू शकत नाही, जरी आम्ही कुजबुजत असलो तरी!

एखाद्याच्या मागे असे काहीही बोलू नका जे तुम्ही त्याच्यासमोर बोलणार नाही. तुम्ही त्यांच्या अनुपस्थितीत जसे म्हणता तेच त्यांच्या उपस्थितीत म्हणावे.

तुमचे अंतःकरण स्वच्छ ठेवा आणि कोणाबद्दलही दुष्ट कल्पना किंवा वाईट भावना बाळगू नका. नेहमी प्रेमात चालण्याचा हेतू ठेवा. अशाप्रकारे तुम्ही लोकांचा अपमान करण्यासाठी, इजा पोहोचविण्यासाठी किंवा त्यांचा नाश करण्यासाठी त्यांना वाईट बोलणार नाही.

**मत्तय 15:19**
**कारण अंतःकरणातूनच दुष्ट कल्पना, खून, व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, शिवीगाळी ही निघतात.**

**रोम 13:9**
**कारण "व्यभिचार करू नकोस, खून करू नकोस, चोरी करू नकोस, खोटी साक्ष देऊ नकोस, लोभ धरू नकोस," ह्या आज्ञांचा आणि दुसरी कोणतीही आज्ञा असली तर तिचाही सारांश, "जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर," ह्या वचनात आहे.**

सूड घेण्यास नकार द्या. निंदा पसरविण्याद्वारे तुम्ही निंदेवर विजय मिळू शकत नाही.

## जेथे शक्य असेल तेथे प्रेमाने सामना करा

जेथे शक्य असेल तेथे, अफवा आणि खोटी माहिती पसरविणाऱ्या व्यक्तीस, किंवा निंदा करणाऱ्या लोकांस त्या बाबी संबंधाने संबोधित करा. निंदा पसरवण्यामुळे होणारे नुकसान पाहण्यासाठी त्यांना प्रेमाने मदत करा. त्यांना त्यातून बाहेर येण्यास प्रोत्साहित करा आणि या प्रकरणाबद्दल वायफळ गप्पा न करता त्यात प्रत्यक्ष गुंतलेल्या व्यक्ती / व्यक्तींसोबत खरी समस्या सोडवा.

## मिटून जाऊ द्या

गप्पागोष्टींना उत्तेजन देऊ नका. निंदा संपुष्टात येऊ द्या. अशा परिस्थितीत जितके कमी बोलले तितके चांगले. अधिक लोक सहभागी होण्यास नकार देत असल्याने, ती गोष्ट शेवटी संपेल.

जेव्हा शक्य असेल तेव्हा, व्यक्ती किंवा परिस्थितीबद्दल सकारात्मक गोष्टी बोलून निंदांचा प्रतिकार करण्याची निवड करा. लोकांना गोष्टींची चांगली बाजू पाहण्यात मदत करा. गप्पा, निंदा आणि अफवा अर्ध्या सत्यावर, अपूर्ण माहितीवर किंवा खोट्या माहितीवर आधारित असतात. म्हणून, गोष्टींच्या चांगल्या बाजूंबद्दल बोलून, आम्ही पसरत असलेल्या अर्धसत्यांचा प्रतिकार करतो.

## प्रार्थना करा, क्षमा करा आणि सोडा

आपण निंदा आणि गप्पांना बळी पडल्यास, प्रार्थना करा. परमेश्वर तुमच्या बचावासाठी येईल.

**स्तोत्र 31:13-16**

**13 कारण पुष्कळांच्या तोंडून माझी बेअब्रू झालेली मी ऐकली आहे; पाहावे तिकडे भयच भय! माझ्याविरुद्ध मनसुबा करून त्यांनी माझा जीव घेण्याची योजना केली.**

**[14] हे परमेश्वरा, मी तर तुझ्यावर भाव ठेवला आहे; मी म्हणतो, "तूच माझा देव आहेस."**
**[15] माझे दिवस तुझ्या हाती आहेत; माझ्या वैऱ्यांच्या हातातून, माझ्या पाठीस लागणाऱ्यांपासून मला सोडव.**
**[16] तू आपल्या सेवकावर आपला मुखप्रकाश पाड; तू आपल्या वात्सल्याने मला तार.**

जेव्हा लोक तुमच्याबद्दल गप्पा मारतात आणि तुमच्याबद्दल अफवा पसरवतात तेव्हा दुःख होते. ते वेदनादायक असते. तुमच्या वेदना आणि दुखावलेल्या भावना देवाला प्रार्थनेत द्या. या बाबीविषयी देवाशी बोला. तुमचे हृदय आणि भावना त्याजपुढे ओता.

जे हे करत आहेत त्यांना क्षमा करा. ते तसे करत असले तरी त्यांच्यावर प्रेम करण्याची निवड करा. ते जे करत आहेत त्यामागे विश्वासघात, सूड आणि इतर चुकीचे हेतू असतील, परंतु तरीही तुम्ही देवाच्या प्रीतीने त्यांच्यावर प्रेम करण्याची निवड करता. तुम्ही तरीही त्यांना क्षमा करण्याची आणि माफ करण्याची निवड करा आणि आपले संरक्षण आणि न्याय यासाठी देवाकडे पहा. *"परंतु तुम्हा ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा; जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा; जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या; जे तुमची निर्भर्त्सना करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा"* (लूक 6:27,28).

## चला आपल्या समुदायास निंदा-मुक्त क्षेत्र बनवूया

आपण अशा लोकांचा समुदाय बनू या ज्यांच्याकडे गप्पा, निंदाबाजी, सूरा खुपसणे आणि चहाडी करणे याविषयी शून्य सहनशीलता आहे. गप्पा करणे, पाठीमागे चहाडी करणे, निंदा करणे, पाठीत सुरा खुपसणे, या अशा गोष्टी आमच्यामध्ये अस्तित्वात राहणार नाहीत! निंदा हे एक तण आहे जे देवाच्या  सुंदर बागेला, मंडळीला त्रास देते आणि त्याची

वाढ थांबविते. आपली बाग तणमुक्त ठेवणारी संस्कृती निर्माण करूया आणि आत्म-शिस्त वाढवूया.

## चिंतन

1) अशा विशिष्ट परिस्थितींना तुम्ही तोंड देत आहात का, जेथे तुम्हाला गप्पा, निंदा आणि चहाडी यावर मात करायची आहे का?
   तुमच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी तुम्ही कोणत्या गोष्टी विशेषकरून करू शकता?

# 6
# प्रार्थना

## पापकबूली आणि पश्चातापाची प्रार्थना

*प्रिय स्वर्गीय पित्या, मी कबूल करतो की, मी माझ्या बोलण्याविषयी जागृत राहिलो नाही. मी जाणूनबुजून, आणि कधी कधी नकळत गप्पा मारल्या, निंदा केली आणि इतरांविषयी वाईट बोललो. मी अफवा पसरविण्याचा आणि लोकांच्या प्रतिष्ठेस हानी पोहोचविण्याचा दोषी आहे. मी माझ्या दुष्कृत्यांबद्दल पश्चाताप करतो आणि तुला विनंती करतो की कृपा करून मला क्षमा कर आणि येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान रक्ताने माझ्या पापांपासून शुद्ध कर. मी निंदेच्या या जीवनशैलीचा त्याग करतो. तसेच, कृपया माझ्या जिभेवर पहारा ठेव यासाठी की मी पुढे गप्पा करू नये, इतरांची निंदा करू नये व त्यांच्याविषयी वाईट बोलू नये. असे करण्यासाठी मी तुझे उपकार मानतो. येशूच्या नावात, आमेन.*

## मागील दिवसांत निंदेमुळे जे दुखावले त्यांच्यासाठी प्रार्थना

*प्रिय पित्या, मी माझे अंतःकरण तुझ्यापुढे ओततो कारण मला माहीत आहे की तू माझ्यावर प्रीती करतो आणि माझी काळजी घेतोस. तुला माझे अंतरंग विचार आणि भावना माहीत आहेत. तुला माहीत आहे की* (लोकांचे किंवा परिस्थितीचे नाव) *माझ्याविषयी पसरलेल्या निंदेमुळे, कुटाळकी आणि अफवांमुळे मला दुःख आणि वेदना झाल्या आहेत. मी माझे दुःख आणि भावना तुजपुढे आणतो आणि तुला विनंती करतो की माझ्या वेदना दूर कर. हे प्रभू, माझ्या भावना आणि आठवणींस बरे कर. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आणि तो मला प्रीती*

*करावयास जे बळ देतो त्याद्वारे, मी मला दुखावणाऱ्या लोकांना क्षमा करतो. त्यांच्यासाठी माझ्या अंतःकरणात देवाने जी प्रीती ओतली आहे ती मी मुक्त करतो. मी तुला विनंती करतो की माझ्या वतीने प्रभु तू दैवीय हस्तक्षेप कर आणि या अफवा, गप्पा, आणि निंदांद्वारे झालेल्या कोणत्याही हानीपासून माझ्या जीवनास मुक्त कर. तुझ्या मर्जीने आणि सन्मानाने माझे जीवन कृपायुक्त कर. तुझा हात मला उंच करो. हे देवा, तू माझे गौरव आणि माझे डोके उंच करणारा आहेस. प्रभू, मी तुजकडे पाहतो आणि माझे डोळे केवळ तुजवर लागले आहेत. माझ्या आयुष्यात तुम्ही केलेल्या कामाबद्दल धन्यवाद, पित्या. येशूच्या नावात, आमेन.*

## जेथे निंदा होत आहेत अशा परिस्थितीत असलेल्यांसाठी प्रार्थना

*प्रिय पित्या, मी माझे हृदय तुझ्यासमोर ओततो कारण मला माहित आहे की तू माझ्यावर प्रीती करतोस आणि माझी काळजी घेतोस. तुला माझे अंतरंग विचार आणि भावना माहित आहेत. तुला माहीत आहे की माझ्याबद्दल* (लोकांची किंवा परिस्थितीची नावे द्या) *पसरवलेल्या गप्पाा, निंदा आणि अफवांमुळे मला दुःख आणि वेदना झाल्या आहेत. मी माझे क्लेश आणि भावना तुझ्याकडे आणतो आणि विनंती करतो की माझ्या वेदना बऱ्या कर. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आणि त्याने मला प्रेम करण्यास जे सामर्थ्य दिले आहे त्याने, ज्यांनी मला दुखावले आहे त्यांना मी क्षमा करतो. माझ्या हृदयात ओतलेले देवाचे प्रेम मी त्यांच्यासाठी मुक्त करतो. मी विनंती करतो की प्रभु तू माझ्या वतीने हस्तक्षेप कर आणि या अफवा, कुटाळकी आणि निंदा थांबव आणि मला तुझ्या कृपेने घेर. माझ्या जीवनास सन्मान दे आणि तुझा हात मला उन्नत करो. परमेश्वरा, मी तुझ्याकडे पाहतो आणि माझी नजर फक्त तुझ्यावर आहे. माझ्या आयुष्यात तू केलेल्या कामाबद्दल धन्यवाद पित्या. येशूच्या नावाने, आमेन.*

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च विषयी

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक / भावनिक अडचणी** |
| **शैक्षणिक क्षेत्रात यशाची उणीव** | **तणाव / आघात** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **मद्यपान / अमली पदार्थांचे सेवन** |
| **कुटुंब / संपत्ती / विवाहपूर्व वैवाहिक** | **आध्यात्मिक समस्या** |
| **पालक / मुले /भावंडे / समवयस्क** | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

गप्पा करणे, निंदा करणे, पाठीत सुरा खुपसणे या अशा गोष्टी आहेत ज्यांचा व्यक्ती, समुदाय, कामाच्या वातावरणावर तसेच इतर सामाजिक संरचनांवर होणारा नकारात्मक परिणाम लक्षात न घेता लोक सामान्यतः त्यात गुंततात. अनेकदा निंदा किंवा गप्पा नावाच्या छोट्या गोष्टीमुळे लोक दुखावले जातात समाज विभागला जातो आणि कामाचे वातावरण प्रतिकूल आणि निष्फळ बनते, निंदा हे एका तणासारखे आहे जे वाढत जाते आणि जर ते लवकर काढून टाकले नाही तर ते एका सुंदर बागेचा नाश करू शकते.

हे साधे पुस्तक आपल्याला निंदेविषयीच्या पवित्र शास्त्रातील शिकवणींबद्दल सावध करते, या जीवनशैलीपासून मुक्त होण्यास मदत करते आणि निंदेस तोंड देण्यासाठी सोपी व्यावहारिक पावले देखील मांडते. आम्हाला आशा आहे की, हे संसाधन कुठल्या तरी प्रकारे, कामाच्या ठिकाणी निरोगी वातावरणास वाढ देण्यासाठी, शैक्षणिक संस्थांना मैत्रीपूर्ण आणि सहाय्यक विद्यार्थी संबंध वाढवण्यासाठी आणि समुदायातील लोकांत एकमेकांप्रत प्रेम आणि काळजीची भावना उत्पन्न करण्यात मदत करेल.

निंदा थांबवा!

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org